# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक : याज्ञसेन पाटणकर

पाटण, दि. २६ : सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात रोजगाराच्या संधीचे स्वरूप बदलले आहे. रोजगाराच्या नवनवीन संधींबाबत माहिती नसल्याने किंवा आवश्यक कौशल्य नसल्याने विद्यार्थी रोजगार किंवा उद्योगापासून वंचित रहात आहेत. त्यामुळे महाविद्यालयात विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर यांनी व्यक्त केले.



मार्गदर्शन करताना याज्ञसेन पाटणकर, व्यासपीठावर डॉ. एस. डी. पवार, श्रीमती स्वाती मोरे, आसावरी कुलकर्णी व इतर.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण अंतर्गत आय. क्यू. ए. सी. विभाग, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती आणि नांदी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगारवर्धन आणि युवा उपजीविका कार्यक्रम महिंद्रा प्राईड क्लासरूमतर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी श्रीमती स्वाती मोरे, आसावरी कुलकर्णी, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे, डॉ. सौ. एस. एस. कुंभार, प्रा. एम. एस. आलदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

याज्ञसेन पाटणकर म्हणाले, आत्ताच्या ऑनलाइन युगात मोबाइलचा वापर अनिवार्य आहे, मात्र तो शिक्षणासाठी जास्तीत जास्त वापर करावा. माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी ई-मेलचा वापर करावा असे त्यांनी सांगितले.

डॉ. एस. डी. पवार म्हणाले, बदलत्या काळात फक्त पारंपरिक शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्यास उपयोगी पडत नाही. त्यामुळेच कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली तर त्याचा निश्चितच फायदा होतो. महाविद्यालयात असे विविध करिअर कोर्स सुरू आहेत. विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

नांदी फौंडेशनच्या स्वाती मोरे यांनी आठ दिवस सुरू असलेल्या कौशल्याधिष्ठित कोर्सची माहिती दिली. जी कौशल्ये आता शिकवली आहेत त्याचा आयुष्यात वापर केल्यास नक्कीच फायदा होईल असे सांगितले.

आसावरी कुलकर्णी यांनी नांदी फौंडेशन व महिंद्रा प्राईडतर्फे असे विविध उपक्रम घेत असतो. त्यामध्ये ग्रामीण भागातील मुलींसाठी असे विविध स्कील शिकणे आवश्यक असल्याने त्यांना त्याचा फायदा भविष्यकाळात होतो. जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

यावेळी कोर्सच्या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली तसेच कोर्सवर आधारित लघुनाटिका सादर केल्या. डॉ. सौ. एस. एस. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. विशाखा गुजर हिने आभार मानले. भाग्यश्री हिरवे व काजल पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, बी. ए, बी. कॉम., बी. एस्सी., आय. टी. व बी. सी. ए. चे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.